सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ३२ | सोमवार, दि. २७ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४

अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!



... पान २

# औट्रम घाट होणार इतिहासजमा...!

## खासदार स्मिताताई वाघ; ५. ५० किमीच्या बोगद्याला केंद्र सरकारची मंजुरी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

धुळे- सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील औट्रम घाट हा राज्यातील सर्वात अवघड आणि धोकादायक घाट म्हणून ओळखला जातो. अनेक वर्षांपासून या घाटावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना अपघात, वाहतूक कोंडी आणि विलंबाचा सामना करावा लागत होता. आता या घाटावरून प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. यासाठी केंद्र सरकारने ५. ५० किलोमीटर लांबीच्या अत्याधुनिक बोगद्याच्या बांधकामास मंजुरी दिली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर सुमारे २ हजार ४३५ कोटी रुपये खर्च होणार आहे. टेलवाडी ते बोधरे या सुमारे १५ किलोमीटरच्या टप्प्यात हा बोगदा उभारला जाणार आहे. या बोगद्यामुळे संभाजीनगर ते पुणे दरम्यानचा प्रवास कमी होईल. यामुळे खानदेश व मराठाड्यातील वाहतुकही सुलभ होईल, अशी माहिती खासदार स्मिताताई वाघ यांनी दिली.

खासदार स्मिताताई वाघ यांनी सांगितले, की घाटाऐवजी सुरक्षित बोगदा उभारावा, ही जनतेची दीर्घकाळापासूल मागणी होती. त्या अनुषंगाने केंद्राकडे वारंवार पाठपुरावा सुरू होता. अखेर केंद्र सरकारने या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. हा निर्णय महाराष्ट्राच्या विकास प्रवासातील ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सडक वाहतूक मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे राज्यातील रस्त्यांचे आधुनिकीकरण वेगाने सुरू आहे. या प्रकल्पामुळे इंधन बचत, वेळेची बचत, अपघातांमध्ये घट आणि पर्यावरणावरचा ताण कमी होईल. माझ्यासह माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड, आमदार मंगेश चव्हाण यांनीही पाठपुरावा केला आहे. केंद्र सरकारच्या या ऐतिहासिक निर्णयाबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे मी मनापासून आभार मानते, असेही खासदार स्मिताताई वाघ यांनी सांगितले.

### खानदेशसह मराठवाड्यातील वाहतूक होणार सुलभ



### प्रकल्पाचे तांत्रिक तपशील

| | |
|---|---|
| बोगद्याची लांबी | ५. ५० किलोमीटर |
| रस्त्याचा एकूण विस्तार | टेलवाडी ते बोधरे १५ किलोमीटर |
| एकूण प्रकल्प खर्च | २ हजार ४३५ कोटी |
| वाहन वेग | ताशी १०० किलोमीटरपर्यंत |

रचना : डबल ट्यूब स्ट्रक्चर, अत्याधुनिक वायुवीजन, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग सुरक्षा सुविधा : फायर सिस्टिम, डिजिटल सेन्सर, सीसीटीव्ही, वाहन नियंत्रण केंद्र



(छायाचित्र : भरत पाटील)

# श्री मंगळ ग्रह मंदिरात 'मन की बात'चे श्रवण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या मासिक रेडिओ श्रवण कार्यक्रमाचे देशभरात आयोजन करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर श्री मंगळ ग्रह मंदिरात रविवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी सकाळी अकरा वाजता हा कार्यक्रम सामूहिक रित्या ऐकण्यात आला.

यावेळी श्री मंगळ ग्रह सेवा संस्थेचे पदाधिकारी, सेवेकरी व भाविकांची मोठी उपस्थिती होती. देशातील जनतेशी थेट संवाद साधणे, समाजातील सकारात्मक उपक्रम, प्रेरणादायी व्यक्ती आणि परिवर्तन घडवणाऱ्या कार्यांची दखल घेणे, नागरिकांमध्ये विविध मुद्यांच्या अनुषंगाने जागरूकता निर्माण करणे, सर्व नागरिकांमध्ये सामाजिक जबाबदारी आणि देशभक्तीची भावना वृद्धिंगत व्हावी, देशाला सर्वच पातळ्यांवर प्रगतीपथावर नेण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करणे पंतप्रधान ते नागरिक ही भावनिक दरी कमी करणे. यासाठी हा उपक्रम राबविला जातो. या महिन्याच्या भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

श्री. मोदी यांनी त्यांच्या मनोगतात स्वदेशी वस्तूंच्या खरेदीचे महत्त्व, स्वच्छ भारत अभियान, कुपोषण निर्मूलन, पर्यावरण संरक्षण, तसेच महिलांच्या सक्षमीकरणावर भर दिला. तसेच देशभरातील काही युवकांनी आणि स्वयंसेवी संस्थांनी केलेल्या उल्लेखनीय कार्यांचा गौरव केला.

यावेळी मंगळ ग्रह सेवा संस्थेचे सचिव तथा भाजप तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुरेश बाविस्कर, प्रकाश मेखा, रजनीकांत पाटील, मनोहर तायडे, विश्वस्त, पदाधिकारी, सेवेकरी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अमळनेर रेल्वे स्थानकाच्या फलाटावर मोठा खड्डा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक एकवर मोठा खड्डा पडला आहे. यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. त्यातच पावसामुळे या खड्ड्यात पाणी साचल्याने खड्डा लक्षात येत नाही. हा खड्डा दीर्घकाळापासून तसाच असल्याचे प्रवाशांनी सांगितले. या खड्ड्यात एखाद्या प्रवाशाचा पाय घसरुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः वृद्ध, महिला व लहान मुलांसाठी ही बाब अत्यंत धोकादायक आहे. रेल्वे स्थानकावरील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे याकडे दूर्लक्ष आहे. रेल्वे प्रशासनाने तत्काळ या खड्ड्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी प्रवाशांसह नागरिकांनी केली आहे.





# प्रशासन झोपल्याने ग्रामस्थ झाले जागे...!

## वाळू माफियांना पकडून महसूल विभागाच्या दिले ताब्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तालुक्यातील बोरी, पांझरा व तापी येथे वाळू माफियांनी खुलेआम हैदोस घातला आहे. खूप मोठ्या प्रमाणावर मोठमोठ्या यंत्रांच्या साह्याने सर्रास वाळू उपसा सुरु आहे. ग्लोबल महातेज बातम्यांच्या धडाक्याच्या माध्यमातून प्रशासनाच्या डोळ्यात अंजन घालण्याचे रोजच काम करतो आहे. तरीही झोपेचे सोंग घेतलेले प्रशासन कुठलीही कारवाई करत नाही. परिणामी आपल्या मातेसमान नदीला वाचविण्यासाठी आता ठिकठिकाणच्या ग्रामस्थांनीच एल्गार पुकारला आहे.

रविवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी ब्राह्मणे, कळंबू, मुडी प्र.डा. व बोदर्डे येथील संतप्त ग्रामस्थांनी वाळू माफियांना ट्रॅक्टरसह रंगेहात पकडून एखाद्या विजेत्याला सन्मानाची ट्रॉफी देतो त्याप्रमाणे ग्रामस्थांनी महसूल विभागाच्या हाती वाळू माफिया व ट्रॅक्टर दिले. दरम्यान, कायद्यानेच स्वतःचे हात बांधून घेतल्याने आणि स्वतःला गड्ड्यांखाली दाबून घेतल्याने आता ग्रामस्थांनीच जागल्याची भुमिका निभावत थेट नाईलाजाने कायदाच हातात घेत सदर कारवाई केली आहे. वाळू माफियांकडे प्राणघातक शस्त्र असतात. थेट महसूल अधिकाऱ्यांनाही ते ट्रॅक्टरच्या चाकाखाली आणण्याची हिंमत करतात, असे गुंड प्रवृत्तीचे व बेदरकार वाळू माफियांशी दोन हात करताना ग्रामस्थांच्या जीवाचे बरे- वाईट झाले असते तर त्यासाठी जबाबदार कोण? या प्रश्नाचे उत्तर अर्थातच प्रशासन त्यांच्या सोयीनेच देईल. जागृत ग्रामस्थांच्या घरच्या लक्ष्म्यांचे कुंकू पुसले गेले तरी चालेल पण आमच्याकडे नियमित लक्ष्मी आली पाहिजे मग नदी, पर्यावरण आणि ग्रामस्थ यांचा सत्यानाश झाला तरी चालेल या अमानवी प्रवृत्तीतून यंत्रणा केव्हा बाहेर पडेल याची सर्वांनाच प्रतीक्षा आहे.

### वाळू चोरी व माफियांविरुद्ध ग्लोबल महातेजचे वृत्त होताहेत सर्वत्र व्हायरल!



### हे आहेत ते जिगरबाज पोलिस पाटील...!

या संपूर्ण कारवाईत ब्राह्मणे पोलिसपाटील गणेश भामरे, बोदर्डेचे पोलिसपाटील श्री. चौधरी, मुडी प्र.डा येथील पोलिसपाटील केशव पाटील यांच्यासह ब्राह्मणे, कळंबू, मुडी प्र. डा. व बोदर्डे ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामपंचायत पदाधिकारींचा सहभाग होता. त्यांनी तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, मंडळ अधिकारी धनराळे, तलाठी सुधीर पाटील यांच्याकडे जमा केलेले ट्रॅक्टर सुपूर्द केले. या कारवाईचे विविध स्तरातून स्वागत केले जात आहे. ग्लोबल महातेजच्या वाळू चोरीविरुद्धच्या बातम्या सर्वत्र व्हायरल होत आहेत. या बातम्यांचे जोरदार कौतुक होत असून त्यांचे सामूहिक वाचन होत आहे.

# इस्लामपूरचे नाव बदलून ' ईश्वरपूर '

## केंद्राची मान्यता, सांगली जिल्ह्याच्या इतिहासातील मोठा टप्पा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर शहराचे नाव अधिकृतपणे ' ईश्वरपूर ' असे बदलण्यात येणार आहे. भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने १३ ऑगस्ट २०२५ रोजी जारी केलेल्या पत्रानुसार या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे. सर्व्हे ऑफ इंडियानेही या बदलाला अंतिम मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे सांगली जिल्ह्याच्या प्रशासनिक आणि सांस्कृतिक इतिहासात नवा अध्याय लिहिला गेला आहे.

इस्लामपूर नगर परिषदेने ४ जून २०२५ रोजी ठराव क्रमांक ८२५ अंतर्गत शहराचे नाव बदलण्याचा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर केला होता. त्यानंतर या प्रस्तावाची भारतीय सर्वेक्षण संस्थेने स्थळ तपासणी आणि पडताळणी करून शिफारस मान्य केली. तसेच सांगलीचे वरिष्ठ पोस्ट ऑफिस अधीक्षक आणि मध्य रेल्वेचे सहाय्यक विभागीय अभियंता, मिरज यांनी प्रस्तावाला समर्थन देत ना हरकत प्रमाणपत्र जारी केले होते.

या सर्व प्रशासकीय प्रक्रियेच्या पूर्णतेनंतर ' ईश्वरपूर ' हे देवनागरी आणि रोमन लिपींमध्ये अधिकृतपणे निश्चित करण्यात आले आहे. भारतीय लिपीतील उच्चारांचे अचूक प्रतिबिंब मिळावे म्हणून नावाचे लिप्यंतर डायक्रिटिक्सच्या वापरासह करण्यात आले आहे. पुढील टप्प्यात राजपत्र अधिसूचना प्रसिद्ध होऊन या नावबदलास कायदेशीर स्वरूप मिळणार आहे. दरम्यान, स्थानिक नागरिक आणि सामाजिक संस्थांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. त्यांचे म्हणणे आहे, की ' ईश्वरपूर ' हे नाव या भागाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पारंपरिक ओळखीचा सन्मान करणारे आहे. अनेक वर्षांपासून ही मागणी केली जात होती. अखेर ती केंद्र सरकारच्या मंजुरीमुळे पूर्ण झाली आहे.

# शिरुडचे निवृत्त मुख्याध्यापक बिऱ्हाडेंचा आदर्श उपक्रम

## भावजयला ओवाळून बहिणीने केला स्त्रीसन्मानाचा जागर



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भाऊबीज म्हणजे प्रेम, आपुलकी आणि नात्यांचा सन्मान व्यक्त करण्याचा दिवस. मात्र, अमळनेर तालुक्यातील शिरूड येथील निवृत्त मुख्याध्यापक भिका बिऱ्हाडे यांनी या दिवशी दिलेला संदेश समाजासाठी एक आदर्श ठरला आहे. श्री. बिऱ्हाडे यांनी " माझ्या आधी माझ्या पत्नीला ओवाळ " असे भगिनीला सांगून स्त्रीसन्मानाचा उत्सव साजरा केला.

या त्यांच्या एका वाक्याने कुटुंबाच्याच नव्हे तर समाजाच्याही मनात विचारांची नवी पालवी फुलवली आहे. भाऊबीजेच्या दिवशी त्यांच्या भगिनी निर्मला सैंदाणे ओवाळण्यासाठी आल्या होत्या. याप्रसंगी त्यांनी भगिनी निर्मला यांना सांगितले, की " माझे आरोग्य, माझा आनंद आणि माझे जगणे सुखाचे असावे यामागे खरे श्रेय माझ्या पत्नीचे आहे. ती माझी सावली, ती माझी साथ आहे, म्हणून आधी तिलाच ओवाळ. " हे ऐकताच निर्मला यांनी भावजयची सन्मानपूर्वक ओवाळणी केली. यावेळी घरातील वातावरण भावनिक झाले होते. ही ही फक्त ओवाळणी नव्हती, तर स्त्रीसन्मानाचा उत्सव होता. समाजात स्त्रीचे योगदान गृहीत धरले जाते. घराची जबाबदारी, मुलांची काळजी, पतीचे सुख- दुःखात खंबीरपणे उभी राहणारी पत्नीच असते. तिच्या श्रमांना कर्तव्य मानले जाते, मात्र, सन्मान दिला जात नाही. मात्र, भिका बिऱ्हाडे यांनी त्यांच्या कृतीतून समाजाला एक मोठा संदेश दिला आहे.

# सोन्याच्या दरात चार दिवसांत आठ हजारांची घसरण

## चांदी किलोमागे ३८ हजारांनी स्वस्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवाळी पर्वात सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेलेल्या सोन्याचा दर लक्ष्मीपूजनानंतरच्या चार दिवसांत तोळ्यामागे आठ हजार रुपयांनी घसरला. चांदीच्या दरात किलोमागे ३८ हजार रुपयांची घट झाली. गेल्या आठ दिवसांत राज्यात सतराशे कोटी रुपयांच्या सोन्याची खरेदी ग्राहकांकडून करण्यात आली. त्यात मुंबईचा वाटा अकराशे कोटींचा आहे.

मुंबई, नाशिक, जळगाव, पुण्यासह राज्यात अंदाजे ४६० टन, तर एकट्या मुंबईत सर्वाधिक ३२० टन सोन्याची विक्री झाली. गेल्या वर्षीपेक्षा सोन्याचा दर दुप्पट असतानाही यावर्षी दिवाळीच्या पहिल्या दिवसापासून ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी केली. नरकचतुर्दशीला सोने एक लाख ३१ हजार रुपये प्रतितोळ्याने विकले गेले. तर चांदीचा किलोमागे दर एक लाख ९१ हजार रुपये होता. दिवाळीनंतर चार दिवसांत म्हणजे शनिवारी

पान ३ वर



सक्सेस स्टोरी...

# पिता सीओ, बेटी बनी आयएएस : अनुकृति तोमर ने यूपीएससी क्रैक कर रचा इतिहास



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यूपीएससी सिविल सेवा परीक्षा दुनिया की सबसे कठिन परीक्षाओं में से एक है। हर साल लाखों उम्मीदवार इस परीक्षा में शामिल होते हैं, लेकिन सफलता केवल कुछ को ही मिलती है। यूपीएससी सीएसई २०२३ की रिजर्व लिस्ट में देश को १२० नए अधिकारी मिले, जिनमें उत्तर प्रदेश के बुलंदशहर जिले के खुर्जा की रहने वाली अनुकृति तोमर का नाम भी शामिल है। अपनी मेहनत और दृढ़निश्चय से अनुकृति ने इतिहास रच दिया। आइए, उनकी प्रेरणादायक सफलता की कहानी जानें।

### अनुकृति तोमर की पृष्ठभूमि

अनुकृति तोमर उत्तर प्रदेश के बुलंदशहर जिले के खुर्जा की निवासी हैं। वह एक साधारण परिवार से आती हैं। यूपीएससी सीएसई २०२३ की रिजर्व लिस्ट में उन्होंने ५३ वां रैंक हासिल किया। उनकी यह उपलब्धि उनके समर्पण और कठिन परिश्रम का परिणाम है।

### पिता हैं पुलिस उपाधीक्षक

अनुकृति के पिता संजीव कुमार तोमर उत्तर प्रदेश पुलिस में पुलिस उपाधीक्षक के पद पर कार्यरत हैं। अनुकृति बचपन से ही पढ़ाई में अव्वल रही हैं। उन्होंने अपनी प्रारंभिक शिक्षा खुर्जा के राजीव इंटरनेशनल स्कूल से पूरी की।

बी.ए. एलएल. बी. और यूपीएससी की तैयारी
अनुकृति ने पुणे के सिम्बायोसिस लॉ स्कूल से बी.ए. एलएल. बी. की डिग्री हासिल की। इस दौरान उन्होंने यूपीएससी सिविल सेवा परीक्षा की तैयारी भी शुरू कर दी थी। उनकी लगन और समय नियोजन ने उन्हें इस कठिन परीक्षा में सफलता दिलाई।

### यूपी पीसीएस में भी चयन

यूपीएससी के अलावा अनुकृति ने उत्तर प्रदेश लोकसेवा आयोग की परीक्षा भी दी। वह इस परीक्षा के साक्षात्कार (इंटरव्यू) राउंड तक पहुंच चुकी हैं, जो उनकी बहुमुखी प्रतिभा को दर्शाता है।

### लाखों युवाओं के लिए प्रेरणा

अनुकृति तोमर की सफलता लाखों युवाओं के लिए प्रेरणा का स्रोत है। उन्होंने साबित कर दिया कि यदि इरादा पक्का हो और मेहनत सही दिशा में हो, तो कोई भी लक्ष्य असंभव नहीं है। उनकी कहानी यह संदेश देती है कि साधारण पृष्ठभूमी से आकर भी असाधारण उपलब्धियां हासिल की जा सकती हैं। अनुकृति तोमर ने अपनी मेहनत, लगन और दृढ़निश्चय से यूपीएससी जैसी कठिन परीक्षा पास कर न केवल अपने परिवार का, बल्कि पूरे देश का नाम रोशन किया। उनकी कहानी हर उस व्यक्ति को प्रेरित करती है, जो अपने सपनों को साकार करने की हिम्मत रखता है।

# गुड लोन आणि बॅड लोन म्हणजे काय? अमृता फडणवीस यांनी दिले सोपे उत्तर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आर्थिक नियोजन हे प्रत्येकासाठी आवश्यक आहे, असे अमृता फडणवीस यांनी ठामपणे सांगितले. त्यांनी एका मुलाखतीत आर्थिक नियोजन, गुंतवणूक आणि कर्ज याबाबत मौल्यवान सल्ला दिला.

आर्थिक नियोजन का आ वश्यक आहे? अमृता फडणवीस म्हणाल्या, की शिक्षण आणि संस्कार जितके महत्त्वाचे तितकेच आर्थिक नियोजनही महत्त्वाचे आहे. एखाद्या बोटीला नकाशा, होकायंत्र आणि दिशा हवी असते. ती नसेल तर बोट भरकटते. त्याचप्रमाणे आर्थिक नियोजन नसेल तर खर्चाची गाडी भरकटते.

### आर्थिक नियोजन कशासाठी?

- स्वप्नपूर्ती : घर, कार, लग्न, मुलांचे शिक्षण.
- तातडीची गरज : वैद्यकीय खर्च, आपत्काल.
- आवक-जावक नियंत्रण : पगारातून २० टक्के बचत अनिवार्य .

उदा. : पगार १०० रुपये असेल तर ५० रुपये नेहमीचा खर्च. ३० रुपये गरजा. २० रुपये बचत/गुंतवणूक (शॉर्ट, मिड, लाँग टर्म).

**थोडक्यात : अमृता फडणवीस यांचा सल्ला–**

१) आर्थिक नियोजन = जीवनाचा नकाशा
२) पगारातून २० टक्के बचत अनिवार्य
३) गुड लोन घ्या प्रगतीसाठी.
४) बॅड लोन टाळा. खर्चासाठी नाही.
आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी आजपासूनच नियोजन सुरू करा.

| गुंतवणुकीचे पर्याय | वैशिष्ट्ये |
|---|---|
| सेव्हिंग | सुरक्षित, कमी व्याज |
| एफडी | निश्चित परतावा |
| लिक्विड फंड | त्वरित रोख |
| एसआयपी | दीर्घकालीन वाढ |
| पीपीएफ | करबचत + सुरक्षित |

> *कर्ज घेणे वैयक्तिक निर्णय आहे. पण गुड लोन तुम्हाला प्रगती देते. बॅड लोन तुम्हाला खर्चात बुडवते.*
>
> *– अमृता फडणवीस*



### गुड लोन विरुद्ध बॅड लोन : अमृता फडणवीस यांचे सोपे स्पष्टीकरण

**गुड लोन**

| प्रकार | कारण |
|---|---|
| होम लोन | घराची किंमत वाढते, सुरक्षितता मिळते |
| शैक्षणिक कर्ज | व्यक्तीचे मूल्य वाढते |
| व्यवसाय कर्ज | उद्योग वृद्धी, नफा मिळतो |

**बॅड लोन**

| प्रकार | कारण |
|---|---|
| कार लोन | शोरूमबाहेर पडताच किंमत कमी होते. |
| फिरण्यासाठी कर्ज | उत्पादक नाही, फक्त खर्च |
| लग्न खर्चासाठी कर्ज | कंबरडे मोडते, परतफेड कठीण |

# सुनिथा कृष्णन : हजारो मुलींना नवजीवन देणारी योद्धा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बालवयातच लैंगिक अत्याचाराचे बळी ठरलेल्या सुनिथाने स्वतःच्या दुःखाला सामर्थ्यात बदलत ४००० हून अधिक मुलींचे आयुष्य वाचवले आहे. बेंगळुरूमधील मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेल्या सुनिथा लहानपणापासूनच सामाजिक कार्याशी जोडल्या गेल्या. फक्त ८ वर्षांच्या वयात मेंटली चॅलेंज्ड मुलांना नृत्य शिकवण्यापासून त्यांनी आपला प्रवास सुरू केला. १२ व्या वर्षी झोपडपट्टीतील मुलांना शिक्षण देत असताना समाजातील विषमता तिच्या डोळ्यासमोर येऊ लागली

**अमानवी अनुभवाने आयुष्याचा प्रवाह बदलला**

तथापि, पंधराव्या वर्षी झालेल्या गँगरेपच्या अमानवी अनुभवाने तिच्या आयुष्याचा प्रवाह बदलला. समाजाकडून आणि अगदी आपल्या माणसांकडूनही नाकारले गेल्यानंतर तिने हैदराबाद गाठले आणि तेथे सामाजिक संघर्षाच्या नव्या अध्यायाची सुरूवात केली. १९९६ मध्ये मिस वर्ल्ड स्पर्धेला विरोध करताना तुरुंगवास भोगावा लागल्यानंतर सुनिथाने ‘ प्रज्वला ’ ही संस्था स्थापन केली. ही संस्था लैंगिक अत्याचार आणि सेक्स ट्रॅफिकिंगच्या विळख्यात सापडलेल्या महिलांच्या पुनर्वसनासाठी काम करते.

‘ प्रज्वला ’ आज पाच आघाड्यांवर काम करते. प्रतिबंध, बचाव, पुनर्वसन, पुनर्संस्थापन आणि वकिली. आज या संस्थेत तब्बल २०० कर्मचारी कार्यरत आहेत आणि ४००० हून अधिक मुलींना नव्या जीवनाची दिशा मिळाली आहे. सुनिथाच्या अथक प्रयत्नांमुळे आंध्र प्रदेश सरकारने २००३ मध्ये सेक्स ट्रॅफिकिंग पीडितांच्या पुनर्वसनासाठी धोरण तयार केले, जे नंतर देशातील अनेक राज्यांनी स्वीकारले.

तिने सुरू केलेले “ Real Men Don’t Buy Sex” हे कॅम्पेन जगभरात १.८ अब्ज लोकांपर्यंत पोहोचले. या संघर्षमय प्रवासादरम्यान सुनिथावर १४ वेळा प्राणघातक हल्ले झाले. ॲसिड अटॅक आणि विषप्रयोगाचे प्रयत्न झाले, तरीही ती आजही समाजासाठी कार्यरत आहे. तिच्या विलक्षण कार्याची दखल घेत भारत सरकारने २०१६ मध्ये सुनिथा कृष्णन यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविले.

# इराणी अभियंत्याचा दावा : पाण्यावर धावणारी कार ६० लिटरमध्ये ९०० कि.मी.!

## तज्ज्ञ म्हणतात, ‘ अशक्य ’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तेहरानमधील सोशल मीडियावर पुन्हा एकदा एक जुना व्हिडिओ चांगलाच चर्चेत आलाय. इराणी इंजिनिअर अलाउद्दीन कासेमी यांनी ‘ पेट्रोल-डिझेलशिवाय केवळ पाण्यावर चालणारी कार ’ विकसित केल्याचा दावा केल्यानंतर नेटकरांमध्ये आश्चर्य आणि उत्सुकता दोन्ही निर्माण झाले आहे.

**व्हिडिओला मिळाल्या हजारो लाईक्स**

१९ ऑक्टोबर २०२५ रोजी शेअर झालेल्या या व्हिडिओला आतापर्यंत ६२ हजारांहून अधिक लाईक्स आणि लाखो व्ह्यूज मिळाले आहेत. मात्र, वैज्ञानिकांनी या दाव्यांवर गंभीर शंका उपस्थित केली आहे. कासेमी यांच्या मते, ही कार पाण्याचे (एचओ) इलेक्ट्रोलिसिसद्वारे हायड्रोजन आणि ऑक्सिजनमध्ये विभाजन करते. नंतर हायड्रोजन जाळून इंजिनसाठी ऊर्जा निर्माण केली जाते.

**सोशल मीडियावर पुन्हा चर्चेत**

या प्रक्रियेमुळे प्रदूषणमुक्त वाहन तयार होते, असा त्यांचा दावा आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार या कारमध्ये ६० लिटर पाण्यात ९०० किलोमीटर किंवा सलग १० तास प्रवास करता येतो. हा व्हिडिओ पहिल्यांदा २०१६ मध्ये यूट्यूबवर झळकला होता. नंतर २०१८, २०२३ आणि २०२४ मध्ये तो पुन्हा व्हायरल झाला. आता २०२५ मध्ये सोशल मीडियावर तो पुन्हा चर्चेत आला आहे. काही वापरकर्त्यांनी याला ‘ ऊर्जेतील भविष्यक्रांती ’ म्हटले, तर इतरांनी ‘ व्हायरल फसवणूक ’ अशी टीका केली.

**ठोस निष्कर्ष नाहीत**

तज्ज्ञांच्या मते, पाण्याचे विभाजन करण्यासाठी लागणारी ऊर्जा हायड्रोजन जाळल्याने निर्माण होणाऱ्या ऊर्जेपेक्षा जास्त असते. हे थर्मोडायनॅमिक्सच्या दुसऱ्या नियमाला विरोधी आहे. त्यामुळे ‘ फक्त पाण्यावर चालणारी कार ’ ही संकल्पना वैज्ञानिकदृष्ट्या शक्य नाही, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. रिव्हर्स इमेज सर्चनुसार हा व्हिडिओ नवीन नसून २०१६ च्या प्रयोगाशी संबंधित आहे. तेहरान टाईम्स आणि प्रेस टीव्हीने त्यावेळी या प्रात्यक्षिकाचा उल्लेख केला होता. पण नंतर या प्रकल्पाबाबत कोणतेही ठोस वैज्ञानिक निष्कर्ष किंवा पेटंट समोर आले नाहीत. तज्ज्ञांनी नागरिकांना सावधपणे वागण्याचा सल्ला दिला आहे. व्हायरल दावे तपासल्याशिवाय त्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले आहे.

### जागतिक स्तरावरील क्रीडापटूंचे विनोदी किस्से...

खिस्तियानो रोनाल्डोचा ‘ सेल्फी माणूस ’ रोनाल्डो एका मॅचदरम्यान मैदानात असताना एक फॅन सुरक्षा वर्तुळ तोडून त्याच्याकडे आला आणि म्हणाला, की एकच सेल्फी घ्यायचा आहे, मग मला अटक करा. सुरक्षारक्षक त्याला पकडणार इतक्यात रोनाल्डोने हसत म्हटले, की ‘ ठीक आहे, पण फिल्टर चांगला लाव’.

# पहिल्याच चित्रपटासाठी ७ दिवस चेहरा धुतला नाही!

## अमिताभ बच्चन यांच्या निष्ठेचा हा ‘ थक्क ’ करणारा किस्सा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महानायक अमिताभ बच्चन यांच्या कामाप्रती निष्ठा ही त्यांच्या यशाची खरी गुरुकिल्ली आहे. ८३ वर्षांच्या वयातही ते सक्रिय असून, ५० वर्षांहून अधिक काळात त्यांनी भारतीय सिनेमावर अमिट छाप सोडली आहे. प्रत्येक भूमिकेसाठी त्यांनी मनापासून मेहनत घेतली आणि पात्रांना जीवंत केले. ही निष्ठा आजही अनेक कलाकारांसाठी प्रेरणास्रोत आहे. या निष्ठेचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे त्यांचा डेब्यू चित्रपट सात हिंदुस्तानी (१९६९). हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला असला, तरी त्याच्या चित्रीकरणातील एक किस्सा आजही थक्क करतो. एका मुलाखतीत अमिताभ यांनी सांगितले, की या चित्रपटासाठी त्यांनी सात दिवस चेहरा धुतला नव्हता. फक्त भूमिकेच्या वास्तवतेसाठी!

**भूमिकेच्या वास्तवतेसाठी केलेला त्याग**

दिग्दर्शक ख्वाजा अहमद अब्बास यांच्या या चित्रपटात अमिताभ यांनी बिहारमधील मुस्लिम युवक अन्वर अलीची भूमिका साकारली होती. या भूमिकेसाठी त्यांनी लूकवर विशेष लक्ष केंद्रित केले. चित्रीकरण गोव्यात झाले, जेथे बजेट अत्यंत मर्यादित होते. त्या काळातील प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट पंधारी जकर अमिताभ यांचा मेकअप करीत होते. मात्र, काही कारणास्तव जकर यांना सात दिवसांसाठी मुंबईला परतावे लागले. पर्याय नसल्याने अमिताभ यांनी आधीचा मेकअप तसाच ठेवण्याचा निर्णय घेतला. या काळात त्यांनी चेहऱ्याला पाणीसुद्धा लावले नाही. जेव्हा जकर परत आले तेव्हा अमिताभ यांचा चेहरा पाहून ते अवाक् झाले. या समर्पणाने प्रभावित होऊन त्यांनी म्हटले, की ‘ तू खूप पुढे जाशील. तुझे कामाप्रती प्रेम तुला एक दिवस सुपरस्टार बनवेल.’ ही भविष्यवाणी खरी ठरली. अमिताभ बच्चन आज भारतीय सिनेमाचे सर्वांत मोठे नाव ठरले आहेत.

अमिताभ यांची ही कथा सांगते, की खरे यश मेहनत आणि निष्ठेने येते. पहिल्या चित्रपटातील हा छोटासा त्यागच त्यांच्या सुपरस्टार होण्याची

# अवघी ४० हजार लोकसंख्या, विमानतळ नाही, स्वत:चे चलनही नाही! तरीही ‘ हा ’ देश जगातील श्रीमंत देशांत अग्रगण्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एखाद्या देशाचे सामर्थ्य मोजताना आपण सहसा सैन्यशक्ती, भूभागाचा विस्तार किंवा आर्थिक स्वातंत्र्य यांचा विचार करतो. मात्र युरोपमधील लिकटेंस्टीन या छोट्या देशाने सर्व पारंपरिक मोजमापांना छेद दिला आहे. अवघ्या ४० हजार लोकसंख्येचा हा देश ना स्वतःचे चलन छापतो, ना आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. तरीही तो जगातील सर्वाधिक प्रतिव्यक्ती उत्पन्न असलेल्या समृद्ध देशांपैकी एक आहे. लिकटेंस्टीनच्या यशाचे रहस्य स्वतः सर्व काही निर्माण करण्यात नसून, जे काही आहे त्याचा सर्वोत्तम उपयोग करण्यात आहे. शेजाऱ्याची करन्सी, पण स्थिर अर्थव्यवस्थाबहुतांश देश आपली ओळख जपण्यासाठी स्वतःचे चलन वापरतात. पण लिकटेंस्टीनने वेगळा मार्ग निवडला. त्यांनी शेजारील स्वित्झर्लंडचे चलन स्विस फ्रँक स्वीकारले. या निर्णयामुळे देशाला मजबूत व स्थिर आर्थिक चौकट मिळाली. त्यांनी स्वतःची केंद्रीय बँक स्थापन करण्याचा प्रचंड खर्च टाळला आणि चलन व्यवस्थापनाचा ताण कमी केला.




### विमानतळ नाही, पण उत्तम संपर्क

अब्जावधी डॉलर्स खर्चून विमानतळ उभारण्याऐवजी लिकटेंस्टीनने स्वित्झर्लंड आणि ऑस्ट्रियाच्या वाहतूक नेटवर्कचा वापर करण्याचा मार्ग निवडला. यामुळे प्रचंड आर्थिक बचत झाली आणि देशाचे पायाभूत ढांचे अधिक कार्यक्षम बनले.

### उद्योग आणि नवकल्पनांमुळे आर्थिक बळ

लिकटेंस्टीनचे नाव ऐकताना अनेकांना ‘ गुप्त बँक खाते ’ किंवा कर स्वर्ग अशी प्रतिमा डोळ्यासमोर येते. पण या देशाची खरी ताकद औद्योगिक नवकल्पनांमध्ये आहे. हा देश प्रेसिजन इंजिनिअरिंग क्षेत्रात जगात आघाडीवर असून, अंतराळ तंत्रज्ञान, ऑटोमोबाईल पार्टस् आणि वैद्यकीय उपकरणांपर्यंत अनेक उत्पादने येथे तयार होतात. जगप्रसिद्ध हिल्टी ही बांधकाम उपकरणे तयार करणारी कंपनी लिकटेंस्टीनमधूनच उदयास आली. याच देशातील कंपन्यांची संख्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. त्यामुळे येथे बेरोजगारी जवळपास शून्य आहे. नागरिकांचे उत्पन्न सातत्याने वाढत आहे.

### कर्जमुक्त आणि गुन्हेगारीमुक्त समाज

लिकटेंस्टीन केवळ आर्थिकदृष्ट्या नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही अत्यंत स्थिर देश आहे. सरकारकडे जवळपास शून्य कर्ज आहे. तो नेहमी महसूल अधिशेषात राहतो. सर्वांत उल्लेखनीय बाब म्हणजे देशात गुन्हेगारी जवळपास नाही. इतका सामाजिक विश्वास आहे, की येथील लोक रात्री घरांचे दरवाजे बंद न करता झोपतात. मर्यादित संसाधनांवरही उत्तम नियोजन, कार्यक्षम धोरणे आणि परिश्रमी नागरिक या त्रिसूत्रींवर लिकटेंस्टीनची समृद्धी उभी आहे. हा छोटासा देश जगाला सांगतोय, की समृद्धी भूभागावर नाही, तर बुद्धी आणि व्यवस्थापनावर अवलंबून असते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# भारतातून तीनशे कोटींच्या शेणाची निर्यात!

## आंतरराष्ट्रीय बाजारात गायीच्या शेणाला प्रचंड मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नीती आयोगानुसार भारतात ३० कोटी गायी आहेत. त्यांच्यापासून एका दिवसात ३० लाख टन शेण मिळते. आंतरराष्ट्रीय बाजारात गायीच्या शेणाची प्रचंड मागणी आहे. भारताने तब्बल ३०० कोटी रुपयांच्या शेणाची निर्यात केली आहे. भारत सुमारे दहा देशांना शेणाची निर्यात करीत आहे.

या यादीत अमेरिका दुसऱ्या, तर चीन चौथ्या क्रमांकावर आहे. भारताने २०२४-२५ मध्ये १२५ कोटी रुपये किमतीच्या ताज्या शेणाची आणि १७३.७ कोटी रुपयांचे शेणखत असे २९८ कोटी ७० लाख रुपयांच्या शेणखताची निर्यात केली आहे.

भारतातून गायीचे शेण आयात करणाऱ्या देशांमध्ये कुवैत, मालदीव, अमेरिका, सिंगापूर, चीन, नेपाळ, ब्राझिल, अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, कुवैत, संयुक्त अरब अमिरात आणि न्यूझीलंड या देशांचा समावेश आहे. यातही कुवैतने सर्वाधिक शेण खरेदी केले आहे. २०२४ मध्ये कुवैतने १९२ मेट्रिक टन शेण खरेदी केले होते. कुवैत गायीच्या शेणाचा वापर खजूरचे उत्पादन वाढविण्यासाठी करीत आहे.

**दिवसाला मिळते ३० लाख टन शेण**

भारतात एका दिवसात ३० लाख टन शेण उपलब्ध होते. यात पहिल्या क्रमांकावर राजस्थान आहे. यानंतर उत्तरप्रदेश व महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. भारतातील १८१ व्यावसायिकांनी जगभरातील ३२७ खरेदीदारांना शेणाची निर्यात केली आहे. जर्मनीचे राजदूत डॉ. फिलिए एकरमॅन यांनी अलीकडेच गोमूत्र आणि शेणाला 'डिप्लोमॅटिक टूल' म्हटले आहे. शेण आणि गोमूत्रापासून जमिनीची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी जर्मन विकास बँकेने आंध्रप्रदेशातील महिलांना आर्थिक साहाय्य दिले आहे.



# एलसीबीचे 'ते' चौघे पोलिस निलंबित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पोलिसांच्या तावडीतून दोन गुन्हेगार बेड्यांसह फरार झाले होते. याप्रकरणी कर्तव्यात कसूर म्हणून पोलीस अधीक्षकांनी एलसीबीच्या चार पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे.

अमळनेर तालुक्यातील लोणे आणि पिंपळे येथील गुरे चोरी प्रकरणात एलसीबी पोलीस संदीप पाटील, प्रवीण मांडोळे, हरीलाल पाटील, राहुल कोळी यांनी तांत्रिक मुद्द्यांच्या आधारे चोरांचा तपास लावला होता. जळगाव येथील अकील कादिर पिंजारी, शाकीर शाह अरमान शाह, अमजद शेख फकीर कुरेशी, आफताब आलम शेख रहीम यांना ताब्यात घेतले होते. बुधवार, दि. २२ ऑक्टोबर रोजी रात्री जळगावहून अमळनेर येथे आणत होते. त्यात शाकीर शाह अरमान शाह व अमजद शेख फकीर कुरेशी हे सराईत गुन्हेगार असल्याने त्यांना बेड्या घालून शासकीय वाहनाच्या मागच्या सीटवर बसवले होते. रात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास कुहे गावाजवळील सती माता मंदिराच्या रेल्वे अंडरपास बोगद्यात गतिरोधकाजवळ वाहन हळू झाले. यावेळी मागच्या सीट वर बसलेल्या दोन्ही गुन्हेगारांनी वाहनातून उतरून पळ काढला. रेल्वे रूळ ओलांडून चोरटे शेतातील पिकांमध्ये गायब झाले. या प्रकरणाची पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी गांभीर्याने दखल घेऊन चारही पोलिसांना निलंबित केले आहे.




# अमळनेर- शेगाव पायी दिंडी रवाना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुंदडा नगर एक परिसरातील सोनार नगरमधील गजानन महाराजांची पायी दिंडी शनिवार, दि. २५ रोजी सकाळी सात वाजता शेगावसाठी रवाना झाली आहे. सालाबादाप्रमाणे हे वारीचे तेरावे वर्ष आहे.

पहाटे मंदिरात महाआरती झाली. त्यानंतर दिंडीला सुरुवात झाली. शहरासह तालुक्यातील भावीक मोठ्या संख्येने दिंडीत सहभागी झाले आहेत. गजानन महाराज मंदिराचे अध्यक्ष व वारी प्रमुख प्रा. आर. बी. पवार यांनी नियोजन केले आहे. ३१ ऑक्टोबर रोजी शेगावला ही दिंडी पोहोचेल. या दरम्यान सकाळी नास्ता, दुपारी जेवण, रात्रीचे जेवण व मुक्कामाची व्यवस्था भावीकांसाठी करण्यात आली आहे. विद्या विहार कॉलनीत सामाजिक कार्यकर्ते जयवंत पाटील यांनी भाविकांना नाश्त्याची व्यवस्था केली. सामाजिक कार्यकर्ते रवी पाटील यांनी फटाक्यांची आतिषबाजी करीत स्वागत केले. येथील सखाराम महाराज मंदिर, सराफ बाजार, पैलाड येथेही पालखीचे स्वागत करण्यात आले. डीजेच्या तालावर भक्तांनी ठेका धरला होता.

# 'मी कुत्र्याला सांगतो, उडी मारू नकोस' : ना. अजितदादा पवार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी बारामती तालुक्यातील पिंपळी येथील नवीन ग्रामसचिवालयाच्या उद्घाटनप्रसंगी आपल्या खास खुमासदार शैलीत ग्रामस्थांशी संवाद साधला. विकासकामांपासून ते स्थानिक तक्रारींपर्यंत अनेक मुद्द्यांवर त्यांनी मिश्किलपणे भाष्य केले. एका कार्यकर्त्याच्या तक्रारीवर ते म्हणाले, की मी येथे उखाणे घ्यायला आलो आहे का? यामुळे उपस्थितांमध्ये हशा पिकला.

**विकासकामांवर टोला**

ना. अजितदादा यांनी विकासकामांच्या गुणवत्तेवर भाष्य करताना म्हणाले, की चांगला कॉन्ट्रॅक्टर असेल तर काम चांगले होते, अन्यथा सरकारलाही त्रास होतो. ज्यांना राजकारण करायचे आहे त्यांनी कॉन्ट्रॅक्टर बनू नये. ज्यांना कॉन्ट्रॅक्टर व्हायचे आहे त्यांनी राजकारणात येऊ नये. त्यांनी रेंगाळणारी कामे टाळण्यासाठी दर्जेदार कॉन्ट्रॅक्टरची गरज अधोरेखित केली.

**निधी आणि योजनांचे आवाहन**

खासदार सुनेत्राताई पवार यांच्या वाढदिवसानिमित्त एका कार्यकर्त्याने मुख्यमंत्री सहाय्यता निधीला ५० हजार रुपयांची देणगी दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मुंबईत १९४ कोटींच्या मॉलचे काम सुरू आहे. येथे महिलांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री होणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात १५ कोटींचा मॉल आणि तालुकास्तरावरही असे मॉल उभारण्याची योजना आहे. आता निधी मागण्याची गरज नाही. योजनांचा फायदा घ्या आणि कामे करून घ्या, असे आवाहनही त्यांनी ग्रामस्थांना केले.

**'कुत्र्याला सांगतो, उडी मारू नकोस!'**

गावातील रस्त्यांवरील अडथळ्यांबाबत एका तरुणाने तक्रार केली, की दादा, रस्त्यावरील डिव्हायडर मोठे करा, कुत्री उडी मारून गाडीसमोर येतात. यावर ना. अजितदादा मिश्किलपणे म्हणाले, की मी कुत्र्याला सांगतो, उडी मारू नकोस! या वक्तव्याने उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. तसेच रस्त्यांच्या कामांसाठी पैसे देण्याचे काम आपले असून, स्थानिकांनी वाद मिटवून कामे करून घ्यावीत.



**तरुणांना चिमटा**

'व्यायामशाळा बांधली आहे, तेथे प्रकृती बनवा. पण बिल्डर झाल्यावर दहशत करू नका,' या शब्दात ना. अजितदादा यांनी तरुणांना वडिलकीच्या नात्याने सल्ला दिला. या कार्यक्रमात ना.अजितदादा यांनी आपल्या खास शैलीत विकासकामांना गती देण्याचे आश्वासन दिले आणि ग्रामस्थांशी थेट संवाद साधला.



# तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234




# स्थानिक नेत्यांच्या मुख्य उपस्थितीत अमळनेरात शिवसेना मेळावा उत्साहात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचा विजयी झेंडा प्रत्येक ठिकाणी रोवला जावा, शिवसेना घराघरात पोहचून पक्षाला बळकटी मिळावी या उद्देशाने दि. २६ रोजी लाडशाखीय वाणी मंगल कार्यालयात शिवसेनेचा मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश केला.

जिल्हा प्रमुख वासुदेव पाटील अध्यक्षस्थानी होते. यावेळी माजी आमदार शिरीषदादा चौधरी आणि ॲड. ललिता पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याबद्दल शिवसेना पदाधिकाऱ्यांतर्फे शिवप्रतिमा देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर युवा सेना जिल्हा प्रमुख रोहित कोगटा, तालुका प्रमुख सुरेश अर्जुन पाटील, शहर प्रमुख संजय कौतिक पाटील, विधानसभा क्षेत्र प्रमुख रवींद्र पाटील, माजी तालुका प्रमुख प्रथमेश पवार, माजी नगरसेवक अनिल महाजन, गुलाब पाटील, सामाजिक कार्यकर्ते सुनील भामरे, पंकज चौधरी, बाळासाहेब संदानशिव, श्रीराम चौधरी, महिला आघाडी शहर प्रमुख चित्रलेखा महाजन, भूषण कोळी, नरेंद्र पाटील, तालुका संघटक गजेंद्र जाधव, प्रसिद्धी प्रमुख अनिल पवार, व्यापारी सेना शहर प्रमुख अमित ललवाणी, तुषार पाटील, दीपक हटवाल, विजय साळुंखे, शोएब शेख पठाण, सुभाष यादव, संतोष पाटील, रिजवान खान, चंद्रशेखर गुजर, रामचंद्र पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी शिरीषदादा चौधरी, जिल्हा प्रमुख वासुदेव पाटील, सुरेश अर्जुन पाटील, ॲड. ललिता पाटील, गुलाब पाटील, रोहित कोगटा यांनी शिवसेना वाढीसाठी प्रत्येक कार्यकर्त्याने एकजुटीने कार्य करावे, असे आवाहन केले.

यावेळी सात्रीच्या महिला कार्यकर्त्या ललिता जगदीश सोनवणे, गांधलीपुराच्या रेखा विक्रम गोयर, ताडेपुराच्या योगिता आकाश पवार तसेच जुनोने, पाडळसरे, रंजाणे, जळोद, सोनखेडी, रामेश्वर, देशमुख वाडा आदी परिसरातील अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. उपशहर प्रमुख प्रवीण पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

# सोन्याच्या दरात चार दिवसांत ८ हजारांची घसरण

**पान १ वरून**

सोने प्रतितोळा एक लाख २३ हजार रुपये, तर चांदी एक लाख ५३ हजार रुपये किलोपर्यंत घसरली, अशी माहिती जळगावातील सराफ व्यावसायिकांकडून देण्यात आली.धनत्रयोदशीपासून सराफ बाजारात सोने आणि चांदीच्या दरात दररोज वाढ होत होती. नरकचतुर्दशीला सोने एक लाख ३१ हजार रुपये तोळा होते, तर चांदी एक लाख ६० हजार रुपये किलो होती. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सोने प्रतितोळा तीन हजार, तर चांदी किलोमागे पाच हजार रुपयांनी घसरली. यामुळे पुण्यासह जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगरमध्ये सोने एक लाख २८ हजार रुपये तोळा, तर चांदीला एक लाख ५५ हजार रुपये किलोचा दर होता.

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

'चमकण्याची'
तसेच आपली
व्यक्तिगत, राजकीय,
व्यावसायिक प्रसिद्धी
जाहिरात रूपाने
प्रचंड मोठ्या प्रमाणावर
करण्याची
सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा
खप असलेले
ब्रॉडशिट आकारातील
चारही पाने रंगीत असलेले
महाराष्ट्रातील एकमेव
वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने
लाखो लोकांपर्यंत
पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

**जाहिरात बुकिंगसाठी संपर्क**
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.

# सलमान खानचा चित्रपट पुन्हा करणार नाही

## दिग्दर्शक महेश मांजरेकर यांचा स्पष्ट निर्णय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अभिनेता आणि दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी दिलेल्या एका मुलाखतीत बॉलीवूड सुपरस्टार सलमान खानसोबत पुन्हा काम न करण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या या वक्तव्याने चित्रपटसृष्टीत नव्या चर्चेला सुरूवात झाली आहे. महेश मांजरेकर यांनी २०२१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'अंतिम : द फायनल ट्रुथ' या चित्रपटाचे दिग्दर्शन केले. सलमान खान फिल्म्स निर्मित या चित्रपटात सलमानने पोलिसाची भूमिका साकारली होती. तर आयुष शर्माही महत्त्वाच्या भूमिकेत दिसला होता.

महेश मांजरेकर म्हणाले, की सलमान खानचा 'अंतिम' हा चित्रपट मी केला. मात्र आता जर कोणी विचारले की पुन्हा सलमानचा चित्रपट करशील का? तर मी थेट नाही असे उत्तर देईन. ते पुढे म्हणाले, की सलमानला वाटते त्याला सिनेमा कळतो. त्याचे वडीलही मेकर आहेत. पण मी थोडासा हेडस्ट्राँग माणूस आहे. 'अंतिम'च्या शूटदरम्यान सलमानने मला बराच त्रास दिला. महेश मांजरेकर यांनी पुढे चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान घडलेला एक किस्सा सांगितला.

एकदा रात्री ३ वाजता सलमान भेटायला आला आणि म्हणाला, 'तुम्ही मला शिव्या दिल्या.' मी त्याला उत्तर दिले, 'मी तुला शिव्या देत नाहीये, तुझ्यातल्या दिग्दर्शकाला देतोय. तू सिनेमा मला दिला आहेस ना, मग आता बाकी गोष्टी विसरून जा.' 'अंतिम : द फायनल ट्रुथ'ने बॉक्स ऑफिसवर अंदाजे ५९.११ कोटी रुपयांचा गल्ला जमवला होता आणि सध्या हा चित्रपट झी ५ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. महेश मांजरेकरांच्या या स्पष्ट वक्तव्यामुळे बॉलिवूडच्या दोन लोकप्रिय व्यक्तिमत्त्वांमधील मतभेद पुन्हा चर्चेत आले आहेत.






# वास्तुशास्त्राप्रमाणे ईशान्येकडील देवघर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

साक्षात परमेश्वराची दिशा म्हणजे ईशान्य दिशा होय. पूर्व आणि उत्तर यांच्या मध्यावरील दिशा म्हणजे ईशान्य कोपरा. वास्तूमधील ही जागा सर्वांत महत्त्वाची मानली जाते. संतान, पुत्र, धन, कीर्ती, भोग, भाग्य, ऐश्वर्य, तपोबल, दैव , देवी देवतांचे आशीर्वाद, गुरू, एखाद्या क्षेत्रातील श्रेष्ठ पद अशा शुभ गोष्टींची ही दिशा आहे.

१) आपल्या वास्तूमध्ये या जागी नेहमी शुद्ध पाणी, देवघर, तलाव, विहीर अंतर्गत पाण्याचा साठा चालेल.
२) या जागी शक्यतो पांढरा किवा फिका पिवळा रंग द्यावा.
३) ईशान्येला नेहमी उतार असावा.
४) ईशान्येच्या बाजूने प्रवेश असल्यास तेथे चप्पल काढू नये.
५) या कोपऱ्यात संडास कचराकुंडी, संडासची टाकी, चप्पल, जीना, वीजमीटर, मोठी झाडे, स्वयंपाकघर, वाहनतळ असणे अशुभ.
६) वास्तूमध्ये ईशान्य दिशा कट असल्यास अशी वस्तू घेऊ नये अथवा योग्य उपाय ताबडतोब करावेत. अशा जागी वंशनाश होतो, दारिद्र्य येते. विनाकारण संकटे येतात.
७) काही महाभाग (ज्योतिष) ईशान्येला संडास असेल तरी विना तोडफोड उपाय करतो, असे सांगून पैसे घेतात. अशा गोष्टींवर ते तोडल्याशिवाय खरोखरच उपाय नाही. उगीचच खोटे उपाय करू नका. कुणालाही ईशान्येला संडास असताना विनातोडफोड उपाय करून फरक पडला असल्यास नक्की कळवा.
८) विनातोडफोड उपाय वास्तूमध्ये होतच नाहीत, असे नाही. मात्र विनातोडफोड ६० ते ७० टक्के उपाय नक्कीच होतात.
९) या जागी रोज देवपूजा करावी, दरवाजा असल्यास स्वस्तिक नेहमी लावावे, या जागी कलश आवर्जून ठेवा.
१०) येथे नवरा-बायकोने झोपणे टाळावेच. अडचण असल्यास घरातील वयस्कर व्यक्ती अथवा लहान मुले चालतील.

## पूर्व दिशा :

१) या दिशेला जमिनीचा उतार असल्यास त्या वास्तूमध्ये ऐश्वर्य, धन व बुद्धीमध्ये वाढ होते.
२) हा भाग उंच असल्यास संततीला धोका असतो. धन नाश होतो.
३) पूर्व जागा जास्तीत जास्त रिकामी असल्यास त्या घरात समृद्धी येते.
४) या दिशेला घराचा दिवाणखाना असावा.
५) मुख्य दरवाजा असावा. शोभीवंत कुंड्या असाव्यात.
६) या जागी संडास असल्यास हृदयरोग, रक्तविकार, उष्णज्वर, शिरोरोग होतात, असे अनुभव आहेत.
७) या जागी फिक्का गुलाबी, क्रीम, पांढरा, असे रंग असावेत.
८) या दिशेला खूप उंच झाडे असू नयेत. परंतु शोभीवंत झाडे नक्कीच असावीत.
९) या दिशेला कुंपण इतर दिशेपेक्षा कमी उंचीचे असावे.
१०) राजकीय क्षेत्रात लाभ मिळविण्यासाठी पूर्वेच्या मध्यभागी मुख्य दरवाजा असावा.

## आग्नेय दिशा :

१) या दिशेला स्वयंपाकघर असणे अत्यंत शुभ व सुखकारक असते.
२) या दिशेला वीजमीटर तसेच जनरेटर, विजेची मोटार अशा वस्तू असाव्यात.
३) आग्नेय दिशेला विहीर, कूपनलिका, पाण्याची टाकी असल्यास शत्रूंचा त्रास तसेच अपघात योग दाखवितात.
४) या दिशेला वाहनतळ करू शकता.
५) हा कोपरा दूषित असल्यास त्या घरात महिलांना जास्त त्रास होतो.
६) या दिशेला काही दोष असल्यास कमीत कमी एक लाल रंगाचा दिवा कायमस्वरूपी तेथे लावावा.
७) या दिशेला दार असल्यास संबंधित तज्ज्ञाकडून उपाय करून घ्यावेत. अशा वेळी घरात नेहमी मतभेद असतात.
८) या दिशेला हलका गुलाबी फिक्कट, केसरी रंग देऊ शकता.
९) अग्नेयेचे दार दक्षिणेला असल्यास दीर्घ रोग व कटकटी असतात.

## दक्षिण दिशा :

१) या दिशेला दार अशुभ आहे. या दिशेला दार असल्याने सतत त्रास होतो. आजारपण असते.
२) ही दिशा नेहमी उंच असावी. तसेच या दिशेच्या भिंतीही इतर दिशांपेक्षा जाड व उंच असाव्यात.
३) या दिशेला सांडपाणी अथवा पाण्याची टाकी असल्यास एकामागे एक असे मृत्यू होतात.
४) दक्षिणेच्या दारावर कधीही पंचमुखी मारुती लावू नका. मासिक पाळीवेळी सर्व स्त्रियां त्याच दाराखालून येतात हे योग्य नव्हे.
५) या दिशेला उंच झाडे लावावीत.
६) या दिशेला निळा भुरका रंग चालेल.
७) या दिशेला संडास, बाथरूम असल्यास पती-पत्नीमध्ये सतत कलह असतो.
८) दक्षिणेला वरती मजला बांधल्यास शुभ फळ मिळते.
९) या दिशेला स्वयंपाकघर असल्यास आर्थिक चणचण असते.
१०) या दिशेला जीनाा शुभ फळ देतो.
११) या जागी तळघर असल्यास अपमृत्यू होतात.




## नैर्ऋत्य दिशा :

१) ही दिशा घरातील इतर सर्व दिशांमध्ये सर्वांत उंच.
२) या दिशेला घरातील मोठ्यांचे बेड रूम असावेत तसेच या दिशेला तिजोरी उत्तरेला तोंड करून ठेवावी.
३) या दिशेला जीना चालेल. संडास, बाथरूम चुकूनही असू नये.
४) ही दिशा कट असल्यास अथवा या दिशेला दार असल्यास आत्महत्या होतात. अपघाती मृत्यू होतो.
५) या दिशेला गोडावून अथवा वाहनतळ चालेल.
६) या दिशेला पाण्याची टाकी वास्तूपेक्षा उंचावर असल्यास अतिउत्तम.
७) जी व्यक्ती घरात या जागच्या खोलीत राहते त्याचेच प्रभुत्व या घरावर राहते.
८) या दिशेला दरवाजा असल्यास त्वरित बंद करावा.
९) या दिशेला संडास पाण्याची टाकी, विहीर उतार असल्यास अपकीर्ती, बाहेरील बाधा चर्मरोग होतात तसेच संकटांची मालिका चालू राहते, असा अनुभव आहे.

## पश्चिम दिशा :

१) या दिशेला नेहमी संडास, बाथरूम असावे.
२) या दिशेला उतार असल्यास त्या घरात स्त्रियांचे प्रभुत्व चालते.
३) ही दिशा उंच असल्यास पुरुषांना कीर्ती मिळते, व्यवसायवृद्धी होते.
४) या दिशेला संडासची टाकी चालेल.
५) प्लॉटमध्ये या दिशेला कमी जागा सोडावी.
६) ईशान्य दिशेपेक्षा जास्त उतार असल्यास दुःख भोगावे लागेल.
७) गडद सर्व रंग चालतील.

## वायव्य दिशा :

१) या दिशेला नेहमी लहान मुलांचे बेडरूम असावे.
२) या दिशेला वरच्या बाजूला पाण्याची टाकी शुभ मानली जाते.
३) या दिशेला विहीर, कूपनलिका, जमिनीच्या खालचा पाणीसाठा, पक्षाघात, वेडेपणा, कावीळ अशा व्याधी दर्शवितात.
४) या दिशेला जीना शुभ मानला जातो.
५) ज्यांचे विवाह जमत नाही अशा व्यक्तींनी या दिशेला झोपावे.
६) व्यवसायाच्या जागी या दिशेचा माल लवकर विकला जातो.
७) या दिशेला संडास चालेल.

## उत्तर दिशा :

१) साक्षात कुबेराची ही दिशा आहे. या दिशेला दरवाजा असल्यास अशा वास्तूमध्ये कधीही पैसे कमी पडत नाही.
२) या दिशेला नेहमी उतार असावा.
३) या दिशेला पाणीसाठा असणे शुभ मानले जाते.
४) या दिशेला कुंपणाची उंची कमी ठेवावी.
५) ही दिशा नेहमी साफ व सुंदर ठेवावी.
६) या दिशेला शोभेची झाडे नक्की लावावीत.
७) महत्त्वाची बोलणी याच दिशेला तोंड करून करावी.
८) या दिशेला जास्तीत जास्त रिकामी जागा सोडावी.
९) या दिशेला संडास असल्यास दारिद्र्य येते.
१०) मुलांनी अभ्यास करताना याच दिशेला तोंड करावे.

# घोड्यांची चित्रे



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वास्तुतज्ज्ञांच्या मते, भिंतीवर सात पांढऱ्या घोड्यांचे चित्र लावल्यास समृद्धी येते. परंतु ते लावताना दिशांची काळजी घेणे आवश्यक आहे. घोड्यांची छायाचित्रे घरी आणि कामाच्या ठिकाणी अशा दोन्ही ठिकाणी लावू शकतो. सात अंक देखील खूप शुभ मानला जातो. कारण सात फेरे, सात ऋषी, इंद्र धनुष्यामध्ये देखील सात रंग असतात.

१) कधीच एकटा असलेल्या घोड्याचे चित्र घरामध्ये लावू नये, हे नुकसानदायक असते.
२) धावणारा घोडा हे प्रगतीचे प्रतीक मानले जाते. धावणाऱ्या घोड्यांचा फोटो लावल्याने आपल्या कामात प्रगती होते, तसेच व्यापारात फायदा मिळतो.
३) कामाच्या ठिकाणी घोड्यांची छायाचित्रे लावताना लक्षात घ्यावे, की त्या छायाचित्रातील घोड्यांची तोंडे आत वळलेली असावी. कामाच्या ठिकाणी दक्षिण दिशेला छायाचित्र लावावे किंवा आपल्या कार्यालयाच्या रचनेनुसार एखाद्या वास्तुतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार फोटो लावावा.
४) जी व्यक्ती दररोज धावत असलेल्या त्या घोड्यांचे चित्र बघते त्या व्यक्तीच्या कामाच्या क्षमतेवर चांगला परिणाम होतो. त्याच्या कामाला गती येते. घोड्यांना समृद्धी आणि ऊर्जेचे प्रतीक मानले जाते.
५) ज्या छायाचित्रांमध्ये घोडे वेगवेगळ्या दिशेला धावत असतील तर ते छायाचित्र लावू नये. चित्र नेहमीच स्वच्छ असले पाहिजे आणि त्यावर धूळ नसावी किंवा ते छायाचित्र फाटलेले किंवा तुटलेले नसावे.
६) जर घोड्यांचे चित्र घरात ठेवायचे असेल, तर ते पूर्वेकडील दिशेला ठेवावे. यामुळे घरात धन धान्याची कमतरता भासत नाही. आई लक्ष्मी घरात कायमस्वरूपी वास्तव्य करते. आपण आपल्या घराच्या डिझाईननुसार वास्तुतज्ज्ञांचा सल्ला घेऊन देखील फोटो लावू शकतो.
७) घोड्यांची छायाचित्रे लावताना हे लक्षात ठेवा, की छायाचित्रातील घोडे हे आनंदी असले पाहिजेत. त्यांना राग आलेला नसावा किंवा घोडे रथ ओढत नसावेत.
८) पांढरे घोडे ऊर्जा आणि समृद्धीचे प्रतीक मानले जातात. ज्या घरात सात घोड्यांचे चित्र ठेवले गेले आहे तेथे पैशाबाबत कमी उतार-चढ़ाव येतात.

# हृदयविकार व सूर्योपासना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हृदयविकारावर पुढे दिलेले उपाय श्रद्धेने केल्यास त्याचे फल निश्चित दिसेल, असा विश्वास वाटतो.

१) ऋग्वेदातील सौरसूक्त मंत्रांनी पाणी अभिमंत्रित करून ते पाणी प्राशन करावे. पाण्याऐवजी दूध अभिमंत्रित करणे हे अधिक चांगले. आपल्या हातातील भांड्यात पाणी वा दूध घेऊन मंत्र म्हटले, की ते पाणी वा दूध अभिमंत्रित होते. (सध्या हा उपाय शक्य नाही.)



२) सूर्यस्तोत्र, आदित्य हृदय, आदित्य कवच रोज म्हणावे. याकरिता संस्कृत उच्चार चांगले आले पाहिजेत. संस्कृत भाषेचा अभ्यास नसल्याने तेही कठीण झाले आहे. मात्र प्रयत्न साध्य आहे.

३) हा विकार झालेला मनुष्य सूर्यनमस्कार घालू शकत नाही. म्हणून बसून सूर्याचे ध्यान (**ध्येय** : सदा सवितृ मण्डल मध्यवर्ती नारायणः सरसिजासनसन्निविष्टः । केयूरवान् मकरकुण्डलवान् किरीटी हारी हिरण्मयवपुर्धृतशंखचक्रः ॥ हा श्लोक म्हणून) करून मित्रायनमः । इत्यादि तेरा नावे म्हणून प्रत्येक वेळी हात जोडून नमस्कार करावा व आदित्यस्य नमस्कारान् हा श्लोक म्हणून तीर्थ घ्यावे. हे करणे सहज शक्य आहे. हा विकार असलेल्या लोकांनी वरील उपाय करून आपले अनुभव कळवावेत.

## सूर्याची बारा नावे :

१) मित्राय नमः २) रवये नमः ३) सूर्याय नमः ४) भानवे नमः ५) खगाय नमः ६) षूष्णे नमः ७) हिरण्यगर्भाय नमः ८) मरीचये नमः ९) आदित्याय नमः १०) सवित्रे नमः ११) अर्काय नमः १२) भास्कराय नमः १३) श्रीसवितृसूर्यनारायणाय नमः

## तीर्थाचा श्लोक :

**आदित्यस्य नमस्कारान् ये कुर्वन्ति दिने दिने ।**
**जन्मानंतर सहस्रेषु दारिद्र्यंनोपजायते ।**
**अकालमृत्युहरणं सर्वव्याधिविनाशनं ।**
**सूर्यपादोदकं तीर्थं जठरे धारयाम्यहम् ॥**

अधिक माहितीसाठी श्रीसूर्यमण्डलस्तोत्रम् स्तोत्र पुस्तक पाहावे.

# साडेसाती म्हणजे काय ?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेव्हा शनी ग्रह जातकाच्या जन्मराशीच्या एक रास आधी, स्वतःच्या जन्मराशीत आणि एक रासनंतर भ्रमण करतो तेव्हा एकूण साडेसातीचा कालावधी सुमारे ७ वर्षे ६ महिने (अडीच + अडीच + अडीच = साडेसात) असतो.

### तीन टप्प्यांचे महत्त्व

**१) प्रथम अडीच वर्षे (पूर्वार्ध) :** शनी जातकाच्या जन्मराशीच्या मागील राशीत असतो. ही वेळ अनेकदा कुटुंब, आरोग्य, मनःशांती या गोष्टींवर परिणाम करते. जुने सोडून नवीन स्वीकारण्याचा हा काळ असतो.

**२) मधली अडीच वर्षे (मध्यकाल) :** शनी जन्मराशीत प्रवेश करतो. या काळात स्वतःच्या कर्तृत्वाची परीक्षा, मानसिक दडपण आणि कर्मफळांचा परिणाम जास्त जाणवतो. मात्र हाच काळ आत्मशोधनाचा आणि धैर्याचा असतो.

**३) शेवटची अडीच वर्षे (उत्तरार्ध) :** शनी जन्मराशीनंतरच्या राशीत प्रवेश करतो. या काळात मागील परिणामांमधून समतोल साधला जातो. जुन्या समस्या सुटतात. परंतु कधी आर्थिक जबाबदाऱ्याही वाढतात. साधारणपणे सावरण्याचा हा काळ असतो.

### साडेसातीची तीव्रता ठरविणारे घटक :

साडेसातीची तीव्रता ही सर्वांसाठी सारखी नसते. ती खालील गोष्टींवर अवलंबून असते.

**१) शनीचे जन्मकुंडलीतील स्थान :** तो केंद्र, त्रिकोणात आहे का? नीच का ? उच्च का ? मित्रराशीत का ? शत्रूराशीत का ?

**२) शनीची दृष्टी शुभ :** ग्रहांकडून दृष्ट असल्यास परिणाम सौम्य होतात.

**३) चालू दशा :** अंतर्दशा जर त्या काळात शनीचीच दशा चालू असेल तर प्रभाव तीव्र असू शकतो.

**४) लग्न आणि राशी यातील भेद :** काहीवेळा लग्न राशीच्या तुलनेत जन्मराशीवर कमी प्रभाव जाणवतो किंवा उलट.

**५) शुभ योग व राजयोग :** जर जन्मकुंडलीत शुभ योग जसे- लक्ष्मी योग, गजकेसरी योग इत्यादी असतील, तर शनीचे अनिष्ट फळ कमी होते.

### साडेसातीचा आध्यात्मिक अर्थ

- शनी हा कर्माचा शिक्षक आहे.
- तो शिक्षा देत नाही, तर शुद्धीकरण करतो.
- तो आपल्याला खरे वास्तव दाखवितो.

'अहंकार, दिखावा, आळस, चुकीचे संबंध, खोटे जीवन' यांचे विसर्जन करायला लावतो. ज्यांनी या काळात संयम, श्रम, साधना, प्रामाणिकता आणि नम्रता स्वीकारली त्यांना शनी अनमोल स्थैर्य आणि यश देतो.

### साडेसातीमध्ये काय करावे?

शनिवारचा उपवास किंवा तेलतीळाचे दान
शनी स्तोत्र / शनी कवच / हनुमानचालिसा पठण
शिव आणि हनुमान उपासना
कष्टातून पळू नका. प्रामाणिकपणे कर्म करा.
वृद्ध, गरीब, श्रमिक या वर्गांचा आदर करा. हे शनीचेच रूप आहेत.

